PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sawarkhed Ek Gaon
Year: 2004

Song: Hoshiyaar
Lyricist:

होशियार
उग्र सूर्य ढळला
अन् नित्य रात झाली
अंधार पसरला भवती
नाही कोण वाली
हात दे साथ दे
लढण्याचा हा करार
होशियार

वाट रोजची वळण वाकडे
बुद्धी दे शक्ती दे
हेच साकडे
वाट रोजची वळण वाकडे
बुद्धी दे शक्ती दे
हेच साकडे

नांदू दे सुखशांती
मागणे हे एकवार
होशियार
धडधडते अंतरंग
शिवशिवती मनगटे
धडधड त्या छातीतून
रौद्र भाव भरू दे
घणघणत्या घंटांचा
भेदतो हा निनाद
होशियार

खेळ सावली भूत बाहुली
भास हा श्वास हा
भिती दाटली
खेळ सावली भूत बाहुली
भास हा श्वास हा
भिती दाटली
जिंकूया संकटास
शस्त्र करू धारदार
होशियार
धडधडते अंतरंग
शिवशिवती मनगटे
धडधड त्या छातीतून
रौद्र भाव भरू दे
घणघणत्या घंटांचा
भेदतो हा निनाद
होशियार

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*